# ग्राम पंचायत दिघोरी

## पंचायत समिती कामठी जिल्हा परिषद नागपूर

## साहित्य खरेदी करिता

## ई-निविदा सूचना सन 2026-2027/2028

याव्दारे सर्व अधिकृत साहित्य पुरवठाधारकास सूचित करण्यात येते की,ग्राम पंचायत दिघोरी ला सन 2026-2027/2028 या आर्थिक वर्षा मध्ये साहित्याच्या आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याकरिता ई-निविदा मागवण्यात येत आहे.तरी इच्छुक पुरवठादारानी साहित्याचे दर सोबतच्या दरपत्रकामधे दि. 27/05/2026 रोजी ०5.०० वाजे पर्यंत जिल्हा परिषद नागपूर च्या वेबसाईटवर सादर कराव्या.सर्व साहित्याचे दर टाकणे बंधनकारक राहील.उशिरा आलेल्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

1. Supply of Construction Material for Gram Panchayat Dighori under General Fund,15th finance commission, Dalitwasti, Nagrisuvidha, Jansuvidha,swach bharat mission gramin -2,nirmal bharat abhiyan,2515 manniy lokpratinidhi suchavili kame,alpsankhayak bahut gramin mulbhut/payabhut suvidha,amdar/khasdar sthanik vikas nidhi,dr babasaheb ambetkar yojna,pani tanchai karekrm and other Funds in year 2026-2027/2028
2. Supply of Electric Material for Gram Panchayat dighori Under Genral Fund V E-Riksha in year 2026-2027/2028
3. Supply of Water Supply Material for Gram Panchayat dighori Under General Fund and Water Supply fund in year 2026-2027/2028

अटी व शर्ती

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दरा ऑनलाईन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिद्धी सूचना शुद्धी पत्रके इत्यादीची माहिती http//mahatenders.gov.in या संकेत स्तळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

२) वरील कामाचे निविदा http//mahatenders.gov.in या संकेत स्तळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर निविदा प्रपत्रे अटी व शर्ती ई-संकेत स्थळावर दि. 20/05/2026 ते दि. 27/05/2026 दुपारी ०४ वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने सादर करता येतील. सदर कामाच्या निविदा बाबद खालील बाबी आवश्यक राहतील.

३) सदर निविदा बाबद खालील प्रमाणे कागद पत्रे व बाबी आवश्यक राहतील.

a) पुरवठाधारकाचे GST प्रमाणपत्र स्कॅन करून अपलोड (Uplod)करावे लागेल
b) पुरवठाधारक नोंदणी प्रमाणपत्र (फोटो सहित) व प्राप्ती कर पॅन कार्ड स्कॅन करून अपलोड (uplod)करावी लागेल.
c) सन २०२४-२५ व मागील २ वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाण पत्र किवा चालान ची सत्यप्रत जोडणे बंधनकारक आहे
d) तसेच आर्थिक वर्षातील GSTR-3B जोडण्यात यावे.
e) उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणतीही वाढिव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
f) निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहतील.
g) **निविदे मधील दरपत्रकामध्ये साहित्यचे दर व त्या साहित्या वर लागणारे GST कराचे दर हे वेगळे - वेगळे दर्शविण्यात यावे अन्यथा दरपत्रिका ग्राह्य मानली जाणार नाही तसेच निविदा मंजूर झाल्या नंतर देयका मध्ये साहित्याचे दर व त्या साहित्या वर लागणारे GST चे दर हे वेगळे दर्शविण्यात यावे या शिवाय कोणताही अतिरिक्त कर देण्यात येणार नाही.**
h) दर पत्रिकेत दर्शविलेले दर चालू बाजार भावाचा आधारित असावे तसेच दर चालू बाजार भावाला आधारित नसल्याची खात्री पटल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार ग्रा.पं. ला राहील.

सरपंच
ग्राम पंचायत दिघोरी (बु.)
प.स. कामठी, जि. नागपूर

सचिव
ग्राम पंचायत दिघोरी (बु.)
प.स. कामठी,जि. नागपूर

Scanned with OKEN Scanner

i) पुरवठा करत असतांना दरपत्रकामध्ये दिलेले साहित्यच पुरवठा करणे बंधनकारक राहतील त्या हलगर्जी पाना चालणार नाही.

j) पुरवठा धारकास शासकीय GST करा मध्ये साहित्याचे दरां मधील बदल झाल्यास सर्व अटी व शर्ती सह बंधनकारक राहील.

k) शासन निर्णय क्र. संकीर्ण२०१८/प्र.क्र.१४४/२०१८ कोषा प्रशा-५ दि.०१/०१/२०१८ नुसार देयका वर २% TDS नियमाप्रमाणे कपात करण्यात येईल.

४) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफाफा क्र १ (तांत्रिक लिफाफा) दि 29/05/2026 रोजी दुपारी १२.०० वाhttp//mahatenders.gov.in या संकेत स्तळावर कार्यालयात उघडण्यात येतीलतांत्रिक अडचण निर्माण झाल्यास हि निविदा समितीने दिलेल्या दिनाकास उघडण्यात येईल.

५) निविदा बाबद कोणत्याही मार्गदर्शक सूचना शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती http//mahatenders.gov.in या संकेत स्तळावर उपलब्ध आहे.

६) सदर कामाच्या ०३ योग्य निविदा प्राप्त झाल्याशिवाय उघडण्यात येणार नाही.

७) पुरवाठादारातर्फे कोणत्याही शर्ती व अटी लावून सादर केलेली ई-निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

८) प्रपत्रातील सर्व साहित्याचे दर टाकणे बंधनकारक राहील.

९) निविदा मंजूर झाल्यास रु ५००/- स्टॅम्प पेपर वर करारनामा (सात दिवसाच्या आत) करून देणे बंधन कारक राहील. ग्रामपंचायत ने देलेल्या मुद्दतीत करारनामा करून न दिल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

१०) ई- निविदा सोबत सत्य प्रती फक्त राजपत्रित अधिकाऱ्याकडून साक्षांकित केलेल्या असाव्यात.

११) बांधकाम साहित्य निविदा फॉर्म किमत ३००० /- रु ची डी.डी. ग्रामपंचायत ला जमा करून नमुना ७ ची पावती निविदेत दि.26/05/2026 ला सायंकाळी 4.०० अपलोड करावी.अन्यथा निविदा अयोग्य समजण्यात येईल.

१२) दिवाबत्ती साहित्य आणि पाणीपुरवठा साहित्य निविदा फॉर्म किमत १००० /- रु ची डी.डी. ग्रामपंचायत ला जमा करून नमुना ७ ची पावती निविदेत दि.26/05/2026 ला सायंकाळी 4.०० अपलोड करावी.अन्यथा निविदा अयोग्य समजण्यात येईल.

१३) मंजूर निविदेत सादर दरपत्रकांन्वयेच साहित्य पुरवठा करणे अनिवार्य राहील साहित्याचे वाढीव दर स्वीकारले जाणर नाही.

१४) निविदा मध्ये दिलेले दरामध्ये साहित्य पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१५) **सदर कामे योजनेचे असल्यामुळे कामे पूर्ण झाल्यानंतर कामाचे मुल्यांकन करून पंचायत समिती व जिल्हा परिषद नागपूर कार्यालया कडून देयक पास व रक्कम प्राप्त झाल्यानंतर पुरवठा धारकांना साहित्याचे देयक अदा करण्यात येईल.**

१६) **बांधकाम साहित्याची रॉयल्टीची रक्कम पुरवठाधारकाने स्वता भरावी लागेल. रॉयल्टी भरल्याची पावती बिला सोबत सादर करावी रॉयल्टीची पावती ग्रामपंचायत च्या नावाने असावी अन्यथा रॉयल्टीची रक्कम बिला मधून कपात करण्यात येईल.**

१७) ग्रामपंचायत ने दिलेल्या मुदतीत साहित्य पुरवठा न केल्यास सदर निविदा धारकाच्या निविदा रद्द करण्यात येईल व या बाबत निविदा धारकाचा कोणताही उजर अथवा आक्षेप चालणार नाही.

१८) एकदा मंजूर केलेली निविदा पुरवठा धारकास मागे घेणे अथवा रद्द करता येणार नाही तसे केल्यास ग्रामपंचायत चे काळ्या यादीत सदर पुरवठाधारकास समाविष्ट करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१९) साहित्य चांगल्या प्रतीचे व प्रमाणबध्द पुरवठा करणे आवश्यक राहील.

२०) कोणतेही कारण न दर्शवता एक किवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायत कडे राखीव ठेवण्यात आले आहे.

२१) ई-निविदा प्रसिद्धी तारखेपासून एक वर्षापर्यंत किवा काम संपेपर्यंत ग्राह्य राहतील.

२२) माटेरील साहित्य यादी वेतिरिक्त इतर साहित्य लागल्यास बाजारभावा प्रमाणे पुरविण्यात यावे

सरपंच
ग्राम पंचायत दिघोरी
पं.स. कामठी, जि. नागपूर.

सचिव
ग्राम पंचायत दिघोरी (बु.)
पं.स. कामठी, जि. नागपूर

ग्राम पंचायत दिघोरी (बु.)
जा.क्र. ______
दि. ______
पं.स. कामठी, जि. नागपूर

# ई – निविदा

## ॥ ग्रामपंचायत दिघोरी ॥

## पंचायत समिती -कामठी, जिल्हा परिषद -नागपुर

याद्वार सर्व पुरवठा धारकास कळविण्यात यते कि, ग्रामपंचायत दिघोरी अंतर्गत 2026 – 2027/2028 या आर्थिक वर्षा करिता विविध योजना अंतर्गत बांधकाम साहित्याचा पुरवठा करण नळ योजना साहित्य व विधूत योजना साहित्य या कामाची वार्षिक ई – निविदा शासनाच्या *www.mahatenders.gov.in* या संकत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आह. तरी इच्छुक पुरवठाधारकांनी आपली ई- निविदा प्रसिद्धी दि. 20 / 05/ 2026 त 27/05/20256 निविदा स्वीकृती दि. 20 / 05/ 2026 त 27/05/2026 ला सायंकाळी 05.00 वाजपर्यंत सादर करावी . शक्यतोवर निविदा दि. 29/05/2026 ला उघडण्यात यईल. उघडण्यातयईल किंव्हा काही तांत्रिक अडचण असल्यास समितीन निर्धारित कलल्या दिनांकास उघडण्यात यईल.

| | |
|---|---|
| सरपंच<br>ग्राम पंचायत दिघोरी ( )<br>पं.स. कामठी, जि. नागपूर. | सचिव<br>सरपंच / सचिव<br>ग्रामपंचायत दिघोरी |

Signature Not Verified
Digitally signed by Sunil Sheshrao Daf
Date: 2026.05.20 16:17:34 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner